Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- XII DECEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती तालुक्यातील अनूसूचित जमातींच्या लोकसंख्या (जनगणना- २०११) साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास

**प्रा.डॉ.लोहकरे परमेश्वर माधवराव**
सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक ,
भूगोल विभाग,कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय,हडोळती,
ता.अहमदपूर जि.लातूर.

**कदम नारायण भिमराव**
पीएच.डी.संशोधक विद्यार्थी
भूगोल विभाग व संशोधन केंद्र,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर.

**शोधसारांश :- (Abstract)**

*चंद्रपूर जिल्ह्यात प्रसिध्द माणिकगड पहाडावरील तेलंगाणा राज्याच्या सीमेलगत नवनिर्मित जिवती तालुका आहे. या तालुक्याला एक बाजूने दक्षिणेस तेलंगाणा राज्याची सीमा आहे. जिवती तालुक्याची एकूण लोकसंख्या ६१८२० इतकी आहे. (२०११ च्या जनगणनेनुसार) तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ५५९.१५ चौ. किमी इतके आहे. जिवती तालुक्यातील लोकसंख्या ही सर्वात जास्त आदिवासी या लोकांची आढळून येते. या आदिवासींमध्येही प्रामुख्याने गोंड, माडीया गोंड, परधान, कोलाम, तसेच आदिवासी व्यतिरिक्त इतर धर्माचे लोक देखील या तालुक्यात वास्तव्य करतात.येथील आदिवासी लोकांमध्ये शिक्षणाचे कमी प्रमाण ,निरक्षरता,अंधश्रध्दा,इत्यादींनी युक्त असलेली लोकसंख्या येथे आढळते.*

*या तालुक्याची इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ही ६१,८२० एवढी आहे. ६१८२० पैकी १७९८८ ही आदिवासी जमातीची लोकसंख्या आहे. व एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ६११६ एवढी लोकसंख्या साक्षर आहे.तर हे साक्षरतेचे शेकडा प्रमाण ३४ टक्के एवढे आहे. हे प्रमाण अतिशय कमी असलेले दिसून येते.*

***बीजसंज्ञा :-*** *अनूसूचित जमाती ,लोकसंख्या साक्षरता .*

**प्रस्तावना :-**

भूगोलातील लोकसंख्या भूगोल या शाखेत लोकसंख्येच्या साक्षरतेचा अभ्यास महत्वाचा असलेला दिसून येतो.१८ व्या शतकापासून मानवी भूगोलाच्या उदयाबरोबरच मानवास केन्द्रस्थानी मानून अभ्यास करण्याची प्रवृत्ती भूगोलशास्त्रात वाढत चाललेली आहे. २० व्या शतकात तर त्यास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. प्रसिध्द भूगोलतज्ञ हम्बोल्ट व कार्ल रिटर यांनी भूगोल विषयाला स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिल्यानंतर अनेक वर्षे भूगोलाचे अभ्यासक नैसर्गिक परिस्थितीला अग्रक्रमाचे स्थान देत होते.व प्रादेशिक भिन्नता निर्माण होण्यास नैसर्गिक परिस्थिती कशाप्रकारे परिणामकारक ठरते याचे स्पष्टीकरण देत होते. अशा अभ्यासात मानवाला विशेष महत्व दिले जात नव्हते.लोकसंख्या ही एक अतिशय महत्वाची नैसर्गिक संपदा असून त्यामध्ये मानवी गुणवत्ता हा या नैसर्गिक संपदेचा आत्मा आहे. मानवाने स्वतःच्या बुध्दिमत्तेच्या जोरावर आपले जीवन सुखी, समृध्द, व विलासी करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे.निसर्गाचा कायापालट मानवाच्या प्रयत्नामुळे झालेला आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वेगवेगळया क्षेत्रात झालेली प्रगती ही मानवी कल्पकतेचा आविष्कार आहे. एखाद्या प्रदेशाचे सामर्थ्य त्या प्रदेशात किती लोक राहतात यावर अवलंबून नसते. तर त्या प्रदेशातील लोकसंख्या किती गुणवान आहे यावर अवलंबून राहते.

**साक्षरता :-**

सर्वसाधारणपणे वाचणे आणि लिहिणे ज्याला जमते त्याला "साक्षर" म्हणून ओळखले जाते.

"Defines Literacy as the ability of a person to read and write with understanding a short simple statement on his every day life."

ग्रामीण भागात स्त्रियांना शिक्षण देण्यास विरोध असतो. लहान मुलींना घरकामामध्ये गुंतविले जाते. तसेच गरीब कुटूंबातील मुलांना व मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. विशेषतः ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते तर शहरी भागात साक्षरतेचे प्रमाण जास्त आढळते. तसेच आदिवासी समाजात तर ते प्रमाण अतिशय अल्प असते.

साक्षरतेला मानवाच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीचा निर्देशांक मानला जातो. साक्षरता व शैक्षणिक पातळी उच्च असलेला देश सामाजिक, आर्थिकदृष्टया प्रगत असतो. लोकसंख्येची साक्षरता शैक्षणिक पातळीशी निगडित असते. जीवनाचा उच्च व निम्नस्तर साक्षरतेवर अवलंबून असतो. जीवनाचा स्तर व साक्षरता यामध्ये अतिशय घनिष्ठ सहसंबंध आढळतो. जीवनमानाचा दर्जा निम्न प्रतीचा असल्यावर साक्षरतेचे प्रमाण कमी असते तर साक्षरता जास्त असेल तर जीवनमानाचा दर्जा उंचावलेला दिसून येतो.

कोणत्याही देशाच्या किंवा प्रदेशाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासात लोकसंख्येच्या साक्षरतेला अनन्यसाधारण असे महत्व आहे. कारण साक्षरता हा घटक देशाचा आर्थिक विकास, सामाजिक उन्नती आणि लोकशाहीचे स्थायित्व यासाठी आवश्यक असतो.त्यामूळेच अनूसूचित जमातीच्या लोकसंख्याविषयक साक्षरता या मूलभूत घटकास महत्व देऊन प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जिवती तालुक्यातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येच्या साक्षरता विषयक घटकाचे भौगोलिक दृष्टीकोनातून अध्ययन केलेले आहे.

**अभ्यासक्षेत्र :-**

**स्थान :-** जिवती तालुक्याचे महाराष्ट्राच्या नकाशातील स्थान पाहता ते महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भातील चंद्रपूर जिल्हयाच्या नकाशात नैऋत्येकडील दिशेस आहे. त्याच्या दक्षिणेस तेलंगाणा या राज्याची सीमा लागून आहे. हा भाग डोंगराळ, व पर्वतीय दऱ्याखोऱ्यांचा आहे तसेच जंगलाचा, दुर्गम व पहाडी म्हणून ओळखला जातो. जिवती हा तालुका चंद्रपूर शहरापासून ५४ कि.मी अंतरावर तर मुंबई पासून ७६८ कि.मी. अंतरावर आहे. या तालुक्यात सेडवाही, टेकामांडवा, येल्लापूर, पाटण, नांदाप्पा, कोदेपूर, नोकेवाडा, गुडसेला, नारपठार इत्यादी गावांचा समावेश होतो.

**विस्तार :-**


जिवती तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १९° २७′ २८″ उत्तर ते १९° ४३′ २७″ उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७८° ५५′ १९″ पूर्व ते ७९° १७′ १२″ पूर्व एवढा आहे. तसेच जिवती तालुक्याचा विस्तार महाराष्ट्राच्या दक्षिण-आग्नेयेस पसरलेला दिसून येतो.

**सीमारेषा :-**

प्रसिध्द माणिकगड पहाडावरील तेलंगाणा राज्याच्या सीमेलगत नवनिर्मित जिवती तालुका आहे.या तालुक्याची निर्मिती ही जून-२००२ साली मा.मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या कार्यकालात झाली. या तालुक्याला एक बाजूने तेलंगाणा राज्याची सीमा आहे. पूर्वेला राजूरा तालुक्याची सीमा,उत्तरेला कोरपना तालूका, दक्षिणेला तेलंगाणा राज्यातील आदिलाबाद जिल्हयातील आसिफाबाद तालुका तसेच पश्चिमेला तेलंगाणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील उतनूर तालुक्याची सीमारेषा आहे. या तालुक्याच्या महत्वाच्या सीमा आहेत. तेंव्हा अशा प्रकारे तेलंगाणा व महाराष्ट्र या दोन राज्यांच्या सीमेवरील अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील हा तालुका आहे. पर्वत, टेकडया नद्या, दऱ्याखोऱ्या व डोंगराळ प्रदेश ,घनदाट जंगले हे सुध्दा या तालुक्याचे विशेष सृष्टीसौंदर्य आहे. एकंदरीत जिवती तालुक्याचा वरील गोष्टींनी विचार केला असता जिवती तालुका चंद्रपूर जिल्ह्यातील एक विशेष तालुका म्हणून ओळखला जातो.तालुक्याच्या मध्यभागी जिवती हे गाव असून तालुक्याच्या पूर्व सीमेवर गणेरी गाव, दक्षिणेला चिखली खुर्द,पश्चिमेला कमलापूर व उत्तरेला धनकदेवी ही गावे आहेत. तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती व तहसिल कार्यालय व पोलिस स्टेशन आहे.

VOL- VII ISSUE- XII DECEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

जिवती तालुक्याचे भौगोलिक स्थान




जिवती तालूक्यातील आदिवासी जमातीचे साक्षरतेचे प्रमाण


| जनगणना वर्ष | एकुण आदिवासी साक्षर व्यक्तीची संख्या (पुरुष+स्त्रिया) | एकुण आदिवासी लोकसंख्या | एकुण अदिवासी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| २०११ | ६११६ | १७९८८ | ३४ टक्के |

**तक्ता क्र. १.१**

संदर्भ- पंचायत क्षेत्र अधिनियम १९९६ पंचायत समिती, जिवती-२०१५

**एकूण आदिवासी साक्षर लोकसंख्या जनगणना २०११ प्रमाणे**


लो.सं. हजारात




आलेख क्र. १.१

संदर्भ – जिवती तालुका लोकसंख्या जनगणना २०११ वरिल आलेखा वरून आपणास समजून येते की, एकुण आदिवासी लोकसंख्या १७९८८ पैकी ६११६ ही साक्षर लोकसंख्या आहे तर ११८७२ ही निरक्षर लोकसंख्या आहे.

**आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरतेची टक्केवारी/शेकडा प्रमाण जनगणना २०११ प्रमाणे**




आलेख क्र. १.२

**उद्दिष्ट्ये :-**

१.चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती तालुक्यातील अनूसूचित जमातीच्या एकुण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण जनगणना-२०११ यावरून साक्षरतेचा अभ्यास करणे.

**माहितीस्त्रोत व संशोधन अभ्यासपध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने लोकसंख्या आकडेवारीचे संकलन करण्यासाठी द्वितीयक स्त्रोतांच्या माहितीचे संकलन करण्यात आले.त्यासाठी चंद्रपूर जिल्हा /जिवती तालुका लोकसंख्या जनगणना अहवाल -२०११ च्या आकडेवारीचा आधार घेतला गेलेला आहे.तसेच जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – २०११ चंद्रपूर जिल्हा अहवाल.विविध शासकीय प्रकाशने,तहसिल व पंचायत समिती कार्यालय,जिवती यांच्याकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीचे विश्लेषण केलेले दिसून येते.

**विषय विवेचन :-**

साक्षरता काढण्यासाठी खालील सूत्राचा अवलंब करतात.

$$\text{साक्षरता} = \frac{\text{साक्षर आदिवासी व्यक्तींची संख्या}}{\text{एकुण आदिवासी लोकसंख्या}} \times 100$$

$$\frac{6116}{17988} \times 100 = 34 \text{ टक्के}$$

संदर्भ — जिवती तालुका लोकसंख्या जनगणना २०११

वरिल आलेखा वरून आपणास हे समजून येते की, एकूण आदिवासी लोकसंख्येचे साक्षरता प्रमाण ३४ टक्के तर या उलट निरक्षरतेचे प्रमाण ६६ टक्के एवढे आहे.

**निष्कर्ष :-**

चंद्रपूर जिल्हयातल्या जिवती तालुक्यातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्याविषयक साक्षरतेचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करताना असे लक्षात आले की, एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ३४ टक्के एवढी साक्षर लोकसंख्या आहे. त्यावरुन खालील निष्कर्ष काढता येतात.

१) आदिवासी समाजातील लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प दिसून येते.

२) स्त्रियांपेक्षा पुरूषामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त असलेले पाहावयास मिळते.

३) साक्षरतेवर राहणीमानाचा दर्जा अवलंबून असतो.

४) विकसीत खेडयांच्या मानाने अविकसित खेडयात विशेषतः आदिवासी खेडयामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असते.

**शिफारशी :-**

१.निरक्षरता ही आदिवासींची प्रमुख समस्या आहे.त्या दृष्टीने साक्षरता वाढविणे गरजेचे आहे.जर आदिवासीमध्ये साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली तर कुटुंबनियोजनाचा प्रसार होईल.व त्यामुळे बेसुमार वाढणा-या लोकसंख्येवर नियंत्रण आणता येणे शक्य होते.

२.आदिवासी समाजात आजही निरक्षरतेमुळे मुलीचा विवाह लहान वयात केला जातो. व त्यामुळे लहान वयात शरिराची सुयोग्य व पूर्ण वाढ होत नाही.परिणामी लोकसंख्येच्या वृध्दिदरात वाढ होते.व त्यामुळे कमी वयात मुलीचा विवाह करणा-यावर शासनाने कायदेशीर उपाययोजना कराव्यात.

३.आदिवासी आश्रमशाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शालेय स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. उदा. मध्यान्ह भोजन योजना कार्यक्रमासारख्या योजना राबविणे गरजेचे आहे.

४. प्रौढ साक्षरता कार्यक्रमाकडे विशेष लक्ष दिले जावे.

**समारोप :-**

अशाप्रकारे सारांशरूपाने थोडक्यात सांगावयाचे झाल्यास भूगोलाच्या लोकसंख्या भूगोल या शाखेत लोकसंख्येच्या साक्षरतेचा अभ्यास महत्वाचा असलेला दिसून येतो.

**संदर्भसूची :-**

१.खराटे,पी.एल.: भारताचा भूगोल,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव .

२.चंद्रपूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०१५.

३.जिवती तालूका लोकसंख्या जनगणना अहवाल-२०११.

४.जाधव सतिश : लोकसंख्या भूगोल,एज्युकेशनल पब्लिशर्स,औरंगाबाद.

५.देशमुख रा.नी. : आपला चंद्रपूर जिल्हा,कल्पना प्रकाशन, नांदेड

६.पाटील व्ही.जे. : लोकसंख्या भूगोल,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

७.अहिरराव वाय.डी. : प्रात्यक्षिक भूगोल,सुमेरु प्रकाशन,डोंबिवली

८.हांगे ए.के., वाघमारे एच.एस. : महाराष्ट्राचा भूगोल,कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.